# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयं, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/1619

तात्काळ : कालमर्यादा दि. २५/०५/२०१८

दिनांक : 18 MAY 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष" या योजनांच्या सन २०१७-१८ करिता तपासणीसाठी प्रलंबित अर्जासाठी उपाय योजनेबाबत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विका/ईबीसी/२०१८/१८१, दि. १०/०५/२०१८

संदर्भीय पत्रान्वये सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील http://www.dtemaharashtra.gov.in या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली होती. सदर अर्ज भरुन घेण्याचा कालावधी दि. १७/०२/२०१८ ते १९/०३/२०१८ पर्यंत व तद्नंतरही काही कालावधी देण्यांत आला होता. **तंत्रशिक्षण संचालनालयाने सदर पोर्टलची लिंक बंद केल्यानंतर काही संस्थांच्या विद्यार्थ्यांचे अर्ज संस्थांनी लिंक बंद झाल्यामुळे स्विकारले नव्हते. त्यामुळे असे अर्ज संस्थास्तरावर प्रलंबित दिसत आहेत. याबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई यांनी संदर्भीय पत्रानुसार सूचित केले आहे की, ज्या संस्थांच्या विद्यार्थ्यांचे असे अर्ज प्रलंबित आहेत. अशा संस्थांनी तात्काळ अशा पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करावेत.** ह्याकरिता ईबीसी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज मंजूर करण्यांकरिता पुन्हा लिंक ओपन करुन देण्यांत आली आहे. अर्ज मंजूर केल्यानंतर संबंधीत संस्थांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

असे अर्ज प्रत्येक संस्थेमध्ये असतीलच असे नाही. त्यामुळे ज्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले असतील परंतु त्यांनी अर्जाची प्रत विहीत कागदपत्रांसह सादर केली नसेल. अशा विद्यार्थ्यांशी त्या त्या संस्थांनी तात्काळ संपर्क साधून त्यांच्याकडून त्यांचे ऑनलाईन अर्जाची प्रत विहीत कागदपत्रांसह उपलब्ध करुन घ्यावी व असे अर्ज ह्या कार्यालयाकडे दि. २५/०५/२०१८ पर्यंत विनाविलंब सादर करावेत. बऱ्याचशा संस्थांमध्ये उन्हाळी सुट्टी चालू असल्यामुळे कदाचित विद्यार्थी उपलब्ध नसतील परंतु अशा विद्यार्थ्यांना दूरध्वनीवरुन किंवा अन्य कोणत्याही संपर्क यंत्रणेमार्फत संपर्क साधून दिलेल्या मुदतीत अर्ज जमा करण्यांबाबत सूचित करावे. अन्यथा पुन्हा लिंक बंद झाल्यावर अशा विद्यार्थ्यांना प्रस्तुत लाभ मिळणार नाही. याची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

(प्रमोद अ. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई